सोलापूर तरुण भारत
४२ वा वर्धापन दिन
सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ | १

# झेपावलेले सोलापूर





सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

## श्री साई चॅरिटेबल ट्रस्ट

सासुरे-वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर



साई आयुर्वेदिक महाविद्यालय अँड रिसर्च सेंटर
इंदिरा पॉलिटेक्नीक (डिप्लोमा इंजिनिअरींग) कॉलेज, सासुरे-वैराग
साई होमिओपॅथी हॉस्पिटल सासुरे-वैराग
* श्री साई औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI)

* संपर्क : 9850268325

तरुण भारत | वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!



बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

## हिंगुलांबिका प्राथमिक शाळा

२१/२२ साखर पेठ, सोलापूर. फोन: ०२१७-२९५१०९०

सुपर सेमी (सुपर ३०) क्लासची सुरुवात २०२५-२६ पासून

तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा



तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!

६ वर्षांपुढील खेळाडूंना धनुर्विद्या खेळाचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक दीपक चिकणे यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाते.

## धनुर्धर आर्चरी ॲकॅडमी, सोलापूर

प्रशिक्षण ठिकाण

जिल्हा क्रीडा संकुल,
कुमठा नाका,सोलापूर
मो. ८१४९००१७१८



दै.तरुण भारतच्या
४२व्या वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!

एक विचार...
एक नीती...
बांधिलकी समाजाप्रती...

## गुरुजी

- एक प्रेरणा...
- एक प्रवास...
- जनसेवेचा अविरत ध्यास...



दलितमित्र
स्व.चंद्राम चव्हाण गुरुजी
यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन...

|| आज परिश्रम कल लाभ ||
मागास समाज सेवा मंडळ संचलित

### जय जवान जय किसान
मुलांची सैनिकी शाळा व ज्युनिअर कॉलेज
नेहरू नगर, सोलापूर

इ. 11 वी (विज्ञान)
ऑफलाईन
## प्रवेश सुरु

शासनमान्य अनुदानित
फक्त मुलांसाठी पूर्ण
### निवासी शाळा

- इ. ११ वी साठी प्रवेश सुरु (विज्ञान)
- इ. ६ वी ते ९ वी मर्यादित प्रवेश

जय जवान जय किसान
मुलांची सैनिकी शाळा व ज्युनिअर कॉलेज
डी.एड. कॉलेज कॅम्पस,
नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर

• शाळेची वैशिष्ट्ये •
- एका वर्गात फक्त ४५ विद्यार्थी
- सर्व स्पर्धा परिक्षांची तयारी (NDA, JEE, CET, NEET)
- सुसज्ज ग्रंथालय व प्रयोगशाळा
- संपूर्ण निवासी संकुल
- भव्य क्रिडांगण व सर्व प्रकारचे क्रिडा साहित्य उपलब्ध
- उत्तम वसतीगृह व भोजन व्यवस्था
- सुरक्षेच्या दृष्टीने परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे
- तातडीची वैद्यकिय सेवा
- कमांडंट व दोन शिक्षण निदेशक यांच्या देखरेखीखाली ड्रील व पी.टी.प्रशिक्षण

संपर्क : 9890921646, 7391919124, 8087413371, 8275516351

सोलापूर तरुण भारत
प्रगत राष्ट्राचे विश्वासनीय दैनिक
लोकहितकारी • व्रतत • वैधक • वाचकप्रिय • वस्तुनिष्ठ • राष्ट्रनिष्ठ • निष्पक्ष • मूल्य व संवेद देणारातोस

सोलापूर तरुण भारत
४२ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...!

## ARIHANT ENGLISH MEDIUM SCHOOL

STD. NURSERY TO STD. 10TH

www.arihantems.com




Address: Rebba Nagar, Near Hira Moti Tower, Vidi Gharkul, Hyderabad Road, Solapur.
Office Mob. 8623088995

Smart Classes | Computer Lab | Science Lab | Library | Sports

महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वाचा जिल्हा म्हणून सोलापूरची ओळख आहे. सोलापूरला प्राचीन परंपरा आहे. इसवी सन पूर्व २०० पासून सोलापूरचे अस्तित्व विविध नावाने ओळखले गेले आहे. सोनलपूर, सोन्नलगी संदलपूर वगैरे... आज सोलापुर जिल्ह्या विविध कारणाने सर्व परिचित आहे. महाराष्ट्राची दक्षिण काशी पंढरपूरचा पांडुरंग, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ, सोलापुरातील श्री सिद्धरामेश्वर, बार्शीचे श्री भगवंत यांच्या मुळे सोलापूर हे केवळ महाराष्ट्रातच नाही तर भारतात आणि परदेशातही प्रसिद्ध आहे.

# सोलापूरचा सर्वांगीण विकास..

पंढरपूरवरून असं एकही गाव नाही की जिथून पंढरपूरला एसटी नाही. हे पंढरपूरचे वेगळेपणच आहे. जसा पांडुरंग, जसे श्री सिद्धरामेश्वर तसाच सोलापूरमधला प्रत्येक माणूस आहे. इथे धर्म, जात, पंथ यापेक्षा माणुसकीला नेहमीच महत्त्व दिले गेले आहे. त्यामुळे सोलापूर मध्ये तेलगू भाषिक, कन्नड भाषिक, उर्दू भाषिक, मराठी भाषिक गुण्यागोविंदाने राहत आहेत. एकेकाळी सोलापूरची जुनी मिल, लक्ष्मीनारायण मिल, नरसिंग गिरजी मिल, यामधील कपडा भारतभर प्रसिद्ध होता. ते सोलापूरचे वैभवच होते. सोलापूरमध्ये जितक्या चाळी आहेत, तितक्या अन्यत्र कमीच आहेत. अशा चाळीत सुद्धा माणसे एकमेकांना धरून राहत होते.

आजही राहतात. सोलापूर चादरीसाठी, टॉवेलसाठी व आता गणवेशासाठी प्रसिद्ध आहे. हा टेक्स्टाईलचा उद्योग परत नावारूपाला येत आहे. सोलापूरची शेंगा चटणी तर परदेशातही आवर्जून नेली जाते. शेंगा चटणीबरोबर कडक भाकरी, शेंगापोळी हे पदार्थही सगळ्यांना फार आवडतात.

सोलापुरातील शिक्षण व्यवस्था ही खूप चांगली आहे. अनेक महाविद्यालय आहेत. एका शहरात तीन महिला महाविद्यालय आहेत आणि त्याचा परिणाम सोलापुरातील मुलींचे शिक्षणाचे महत्त्व खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहे. ही खरंच कौतुकाची गोष्ट आहे. या मुली कष्टाळू प्रामाणिक असल्यामुळे त्यांना रोजगारासाठी प्रश्न येत नाही. सोलापुरातील बिडी कामगारही कष्टाळू आहे. पूर्व भागामध्ये हजारो स्त्रिया बिड्या करून आपल्या संसार आनंदाने पार पाडत आहेत.






सोलापूर इतके चांगले डॉक्टर दुसरीकडे किती आहे याचा मला कधी कधी प्रश्न पडतो. खरोखरच सोलापूरचा मेडिकल हब फार विश्वसनीय आहे. त्यामुळेच कर्नाटक, आंध्र, तेलंगणा, महाराष्ट्रातील इतर ठिकाणाहून लोक सोलापूर मध्ये ट्रीटमेंटसाठी येत असतात. सोलापूरचे डॉक्टर या सेवा भावनेने काम करतात. ते खरोखरच कौतुकास्पद आहे. साहित्य क्षेत्रातही सोलापूर मध्ये पाच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखा आहेत व इतर तालुक्यातही या शाखा चांगल्या प्रकारे काम करत आहेत. हे सगळे चित्र खूप विलोभनीय आहे. आनंद देणारे आहे. परंतु अलीकडे मात्र या वीस पंचवीस वर्षात सगळे चित्र बदलले आहे. सोलापूरमध्ये कुठलेही उद्योगधंदे नसल्यामुळे तरुण पिढी, व्यसनाच्या, उत्सवाच्या मिरवणुकीच्या मागे लागली आहे. कारण त्यांच्या हाताला कामच नाही. रिकामटेकडे आणि आभासी दुनियेत जगणारे तरुण वाढत आहेत. ही खूप चिंतेची गोष्ट आहे. तसं बघितलं तर सोलापूर हे उष्ण शहर आहे. आपण नेहमी गमतीने म्हणतो की, सोलापूरमध्ये दोनच ऋतू कमी उन्हाळा आणि जास्त उन्हाळा. सोलापूरमध्ये इतके ऊन असले तरीसुद्धा जे सोलापूरकर आहेत त्यांना त्या उन्हाचे फारसे काही वाटत नाही. ते ४४-४५ डिग्रीमध्ये सुद्धा चांदण्यात फिरल्यासारखे फिरत असतात. याला कारण आहे सोलापूरच्या लोकांची सहनशक्ती.

एकादृष्टीने जरी ही गोष्ट चांगली असली तरी, दुसरीकडे मात्र ह्या तरुणांच्या हाताला काम नाही आणि म्हणून ते शहर सोडून जात आहेत. ज्यांना शक्य असेल ते जातात. पण ज्यांना ते शक्य नाही, ते मग इथेच पडेल ते काम करत, उरलेला वेळ मिरवणुकी काढत, मोबाईल बघत घालवतात तरुणांची ही शक्ती ही वाया चालली आहे. तिचा कुठेतरी वापर झाला पाहिजे. खरंतर सोलापूर हे पुण्यापासून फक्त चार तासाच्या अंतरावर आहे. इथले हवामान चांगले आहे. इथे जागा भरपूर आहे. इथे कष्टाळू माणूसबळ आहे.




प्रा. डॉ. श्रुती वडगबाळकर
भ्र. ९३२५०४६४१५


रेल्वेची बसची सोय चांगली आहे. आता विमानाची सुरू झाली आहे. पण ती प्रवाशांची संख्या फारशी नाही, म्हणून बंद होत आहे. कशी वाढणार संख्या? जर त्यांना पैसाच मिळत नसेल तर त्यातून ते विमानाने कसा प्रवास करणार. आधी उद्योगधंदे आणा. त्यांना महिन्याला दोन- तीन लाख रुपये पगार मिळू द्या, तेही तरुण आनंदाने विमान प्रवास करतील. पण यासाठी तरुणांनी योग्य शिक्षण,जिद्द, चिकाटी, कष्ट यांची पण तयारी केली पाहिजे. सोलापूरच्या बऱ्याच पालकांची आणि तरुणांची मानसिकता सोलापूर सोडण्याची नाही. बाहेर जाऊन जास्त कष्ट करून चार पैसे मिळवावेत. असं त्यांना फारसं वाटत नाही. उलट आपल्या गावांमध्ये जेवढी चटणी भाकरी मिळेल तेच खात राहायचं. ही भूमिका त्यांच्या विकासाला आणि शहराच्या विकासाला ही मारक आहे. तुम्ही बाहेर जाऊन स्वतःला सिद्ध करा. आणि सोलापुरात येऊन स्वतःचा उद्योगधंदा उभा करा. ही आजची सोलापूरची सर्वात मोठी गरज आहे. कोणत्याही कामाची लाज न वाटता जशी सुरुवात करता येईल तशी सुरुवात केली पाहिजे. सोलापूरच्या विकासासाठी या तरुणांनीच पुढाकार घेतला पाहिजे. सोलापूरमध्ये असे काही उद्योग आहेत की ज्यांनी भारतभर नावलौकिक मिळवला आहे. त्यांचा आदर्श आपण घेतला पाहिजे. आणि त्यांच्यासाठी राजकीय व्यक्तींनी प्रयत्न केले पाहिजे. रस्ते चांगले झाले आहेत. पण अलीकडे सगळ्याच क्षेत्रात जी खाबूगिरी सुरू झाली आहे त्यामुळे विकासाला अडथळे येतात. प्रत्येकजण जर प्रामाणिकपणे आपलं काम करेल तर त्याचाही विकास होईल आणि शहराचाही विकास होईल. सोलापूर जिल्ह्यामध्ये खूप चांगल्या संधी आहेत, आपल्याला त्याचं नियोजन करावे लागेल. पर्यटन व्यवसाय वाढण्यासारखा आहे पण त्यासाठी त्या व्यवसायातून सामान्य लोकांची सोय झाली पाहिजे. आजकाल अक्कलकोट मध्ये लाखो लोक येतात. उभे राहायला जागा नसते. अशा वेळेस तिथे जर आपण एखादा उद्योग चालू केलात तर निश्चितच तरुणांना काम मिळेल. सोलापूरचे साहित्य क्षेत्र संपन्न आहे. समृद्ध आहे अनेक सर्जनशील साहित्यिक सोलापूर मध्ये होते, आजही आहे.

अलीकडे या दोन- तीन वर्षात वाचन संस्कृती वाढण्यासाठी प्रिसिजन वाचन अभियानाने खूप प्रयत्न केले आहेत. ही आशादायी गोष्ट आहे. असेच उपक्रम विविध प्रकारचे व्हायला पाहिजेत. कोणाचीही जयंती असेल, एखादा दिवस असेल तो साजरा करताना समाजपयोगी तो कसा होऊ शकेल, याचा आधी विचार केला पाहिजे. आपल्या उपक्रमामुळे फक्त आपल्यालाच आनंद मिळणार की समाजाचे हित होणार हे बघावे. सोलापूर शहर किंवा जिल्हा हा खरोखरच एक आदर्श जिल्हा व्हावा. इथल्या तरुणांची नावे भारतभर व्हावीत हीच मनोकामना आहे.

दैनिक तरुण भारतने हा विषय देऊन सर्वांनाच विचार करायला प्रवृत्त केले. मला वाटतं अनेकांच्या लेखातून आपल्याला विकासासाठी कोणती ना कोणती तरी दिशा मिळेल आणि त्यातून काहीतरी चांगले घडेल. हा विश्वास आहे. दैनिक तरुण भारत यांनी नेहमीच समाजाचा, राष्ट्राचा, तरुणांच्या भवितव्याचा विचार केला आहे. हे वर्तमानपत्र निश्चितच वास्तवाची जाण ठेवणारे आहे. सोलापुरातीलच नव्हे तर जिल्ह्यातील आणि आजूबाजूच्या जवळच्या गावातील ही बातम्या यामध्ये आवर्जून येतात. देशाच्या प्रदेशाच्याही घडामोडींची आवर्जून दखल घेतली जाते. अनेक पुरवण्याच्या माध्यमातून विविध विषयांवर विचार मंथन होत असते. राजकारण, समाजकारण, क्रीडा, साहित्य, संस्कृती, महिला विश्व अशा सर्व गोष्टींवर तरुण भारत मध्ये बातमी असतेच त्यामुळे ते सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय आहे. त्यामुळे दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनास खूप शुभेच्छा...







# साहित्यात सोलापूरच्या महिलांच योगदान

सोलापूर शहरातल्या साहित्य विश्वाचा विचार केला असता सोलापूर ही साहित्य रत्नाची खाण हे लक्षात येते. कारण या शहराने एकापेक्षा एक श्रेष्ठ अशा साहित्यिकांना जन्म दिला आहे. संत-साहित्य, शाहिरी, भारुड, काव्य, कांदबरी, समिक्षा, कथा, लेख, विनोद, प्रवासवर्णन, अनुवाद अशा विविध साहित्य माध्यमांतून या शहराने मराठी संस्कृतीला व महाराष्ट्राला सतत नवे काहीतरी दिले आहे. सीमावर्ती भागात असल्यामुळे व शहरात तेलुगु भाषिकांची मोठी संख्या असल्यामुळे कन्नड व तेलुगु या दोन्ही भाषांनाही सोलापुरने स्थान दिले आहे. सोलापूर नगरीने मराठी सारस्वताला एकापेक्षा एक असे दर्जेदार कवी-कवयित्री दिले आहेत. काव्यनिर्मितीला शहरात अजूनही अनुकूल वातावरण आहे. काव्यलेखन आणि काव्यमैफीलीने शहरातले अनेक ताज्या दमाचे कवी या शहरात कीर्ती बुलंद करीत आहेत. अशी सोलापूरची ओळख आहे.

जन्माने सोलापूरचे असलेले महाराष्ट्र साहित्यिक व सांस्कृतिक इतिहासात स्वतःच्या कर्तृत्वाने वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करणाऱ्या मान्यवर जेष्ठ साहित्यिक आहेत. स्वर्गीय डॉ. श्रीमती जगदेवी ताई लिगाडे यांची मातृभाषा कन्नड असूनही त्यांनी मराठी व कन्नड या दोन्ही भाषांत प्रचंड वाक्य निर्मिती केली. कर्नाटक महाविद्यालयाने त्यांना १९७१ मध्ये डी. लिट पदवी बहाल केली. म्हैसूर राज्य साहित्य आणि ललितकला ॲकॅडमीकडून त्यांचा गौरव है। साहित्यलेखनाबद्दल झाला. कै. श्रीमती शांता माधव कविता, लेख यांचे विपुल लेखन त्यांनी केले. कै. शशीकलाताई साळगांवकर यांचा शेवटचा 'ममता' हा काव्यसंग्रह खूपच वाचकप्रिय झाला.

श्रीमती सुरेखाताई शहा ह्या 'जोहड' या कांदबरीमुळे महाराष्ट्रभर कीर्तीवंत झाल्या आहेत. जोहड कांदबरीच्या विविध भाषेतून आवृत्या निघून त्यावर चित्रपट निर्मिती झाली. सौ. सुनेत्राताई पंडीत यांनी 'सहज सुचलं म्हणून' या सदराचे तसेच 'बसल्या बसल्या म्हणून' या कथासंग्रहाने वाचकांची मने जिंकली श्रीमती सुमनताई झाडबुके, सिंधुताई टिळक, मोहिनी पिटके, मेधा भोसेकर, श्रीमती शोभा देशपांडे, जयश्री लाटकर, शशीकला उत्पात, सिंधु टिळक, सीमा पाटील, उषा तुपकर, प्रविणा कुसूरकर, मयुरी शहा अशा अनेक जेष्ठ लेखिका, कवयित्रींनी आपल्या साहित्य लेखनाने सोलापूरांत, महाराष्ट्रात नावलौकिक प्राप्त केला. सध्याच्या काळांतही स्त्री साहित्याची परंपरा जोपासणाऱ्या मान्यवर लेखिका कवयित्री आपल्या लेखणीतून ठसा उमटवित आहेत. कु. लता अध्यापक, शांता क्षिरसागर, जयश्री लाटकर, निर्मला मठपती, वंदना कुलकर्णी, प्रज्ञा निंबाळकर, शारदा तालिकोटी, रेणुका बुधारम, अस्मिता गायकवाड, वैशाली अघोर, कविता मुरुमकर, डॉ. श्रुतिश्री वडकबाळकर, डॉ. नसिमाताई पठाण, वैशाली गुंड, सुषमा हिरेकेरुर, निर्मला मुशन, माधुरी शहा, अंजली श्रीवास्तव, डॉ. अंजली कदम, सौ. स्मिता पाटील, नयना कोठाडिया, शैलशिल्पा जाधव,आशा पाटील, सौ. दुर्गा जोशी, पंचशीला कांबळे, सौ. आरती काळे, डॉ. लता अकलुजकर, रेखा शहा, विशाखा काळे. विद्या कलकर्णी स्वाती कराले विद्याकालेश बोल्ली, मृद्दा गोखले आशालता जगताप, सुलभा दहिहंडे, पार्वती घाडगे, कमलादेवी आवटे, सुमन उज्वला साळखे, पुष्पा गायकवाड, पुष्पा आगरकर अशा चंद्रशेखर, ॲड, अपर्णा रामतीर्थकर, सरिता मोकाशी, अनेक लेखिका-कवयित्री विविध वृत्तपत्रे, दिवाळी अंक, नाट्यलेखनातून, पुस्तके लिहून सोलापूरचे नावलौकिक अजरामर करण्याचा आपआपल्या परीने प्रयत्नशील आहेत. साहित्याने समाज घडवावा, साहित्याने संस्कृती जतन करावी. लेखिका- कवयित्रींनी आपले साहित्य समाजापुढे केवळ एक प्रमाण म्हणून न येता साहित्य समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.




शोभना सागर
भ्र. ९२२५८३८८९५


साहित्य समाजाचा 'आरसा' आहे. हित साधणारे असे साहित्य विचार प्रवृत्त करणारे ठरावे. साहित्य आणि समाज यांचे अतुट नाते असते. पूर्वीच्या लेखन शैलीचे वाचन सध्याच्या परिस्थितीवर परिणाम करणारे प्रभावी लेखन करावे. आज सर्वत्र अत्याचार, हुंडाबळी, भ्रूणहत्या, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा, महिलांवरील बलात्कार, महिला संरक्षण, शिक्षणाचा, संस्काराचा अभाव, प्रसार माध्यमांचे अनुकरण, माणसातल्या माणुसकीचा अभाव, दया, क्षमा, यांचा अभाव, मोबाईलचा दुष्परिणाम, वाढती महागाई, वैचारिक दृष्टी, अज्ञान, आर्थिक उधळण, समाजातील अराजकता, जातीभेद अशा अनेक गोष्टी आपल्या लेखणीतून मांडून ज्वलंत प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला तर साहित्य दिशा देणारे ठरेल साहित्यामध्ये प्रचंड ताकद आहे. आपली लेखनी धारधार व प्रभावी असावी. एवढीच श्री सरस्वतीचरणी प्रार्थना !



# पंढरपूर विकासाचा नवा अध्याय



## पंढरपूर कॉरिडॉरमुळे स्मार्ट तीर्थक्षेत्राकडे वाटचाल

**पंढरपूर म्हटले की डोळ्यांसमोर उभे राहते ते श्री विठ्ठल-रुक्मिणीचे मंदिर, चंद्रभागेचा वक्राकार घाट, टाळ-मृदुंगाचा निनाद आणि लाखो वारकऱ्यांच्या मुखातून घुमणारा ज्ञानोबा-तुकारामचा जयघोष. शेकडो वर्षांची भक्तीपरंपरा लाभलेल्या या नगरीला केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्याही मोठे महत्त्व आहे. मात्र, बदलत्या काळात वाढणारी भाविकांची संख्या, वाहतुकीवरील ताण, अपुऱ्या नागरी सुविधा आणि शहर विस्ताराची गरज लक्षात घेता पंढरपूरच्या नियोजनबद्ध विकासाची आवश्यकता आज अधिक तीव्रतेने जाणवत आहे.**

या च पार्श्वभूमीवर प्रस्तावित पंढरपूर कॉरिडॉर अर्थात विठ्ठल– रुक्मिणी मंदिर परिसर व वाणिज्य संकुल आराखडा हा पंढरपूरच्या विकासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. अयोध्या, काशी आणि उज्जैनप्रमाणे पंढरपूरलाही आधुनिक सुविधांनी युक्त, जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र बनविण्याची क्षमता या प्रकल्पात आहे. मात्र, हा विकास केवळ भव्यतेचा नसून, वारकरी परंपरा, स्थानिक संस्कृती आणि शहराचे मूळ स्वरूप जपत झाला पाहिजे, ही अपेक्षाही तितकीच महत्त्वाची आहे.

आज आषाढी आणि कार्तिकी वारीत लाखो भाविक पंढरीत दाखल होतात. मंदिर परिसरात दर्शनासाठी तासन्तास रांगा, वाहतुकीची कोंडी, पार्किंगची कमतरता आणि अपुऱ्या मूलभूत सुविधांमुळे भाविकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. प्रस्तावित कॉरिडॉरमुळे दर्शन व्यवस्था अधिक सुलभ होईल, पादचारी मार्ग विकसित होतील, आधुनिक प्रतीक्षागृहे, स्वच्छतागृहे, सुरक्षा व्यवस्था आणि आपत्कालीन सुविधा उपलब्ध होतील. त्यामुळे भाविकांचा वेळ वाचेल आणि दर्शनाचा अनुभव अधिक सुखकर बनेल. मात्र, विकासाच्या नावाखाली पंढरपूरची ओळख पुसली जाऊ नये.

मंदिराभोवतीचा ऐतिहासिक वारसा, प्राचीन मठ, जुन्या वास्तू, वारकरी परंपरेशी जोडलेली स्थळे आणि स्थानिक जीवनशैली यांचे जतन करणे तितकेच आवश्यक आहे. कॉरिडॉर हा केवळ कॉँक्रीटचा प्रकल्प न राहता श्रद्धा आणि संस्कृतीचा विस्तार ठरला पाहिजे. विकासाच्या प्रक्रियेत बाधित होणाऱ्या नागरिकांचे योग्य पुनर्वसन, व्यापाऱ्यांचे हित आणि लोकसहभाग या बाबींकडे शासनाने संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे.

पंढरपूरच्या विकासाचा दुसरा महत्त्वाचा आधार म्हणजे चंद्रभागा नदी. ही नदी केवळ जलस्रोत नाही, तर वारकरी भक्तीचा अविभाज्य भाग आहे. नदीचे प्रदूषण रोखणे, घाटांचे संवर्धन, नदीकाठाचे सुशोभीकरण आणि पर्यावरणपूरक विकास याला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. स्वच्छ चंद्रभागा हीच पंढरपूरची खरी ओळख आहे. धार्मिक पर्यटन ही पंढरपूरच्या अर्थव्यवस्थेची मोठी ताकद आहे. वर्षभर भाविक आणि पर्यटक येत असल्याने हॉटेल व्यवसाय, वाहतूक, प्रसाद उद्योग, हस्तकला, फुलांचा व्यवसाय, स्थानिक खाद्यसंस्कृती आणि लघुउद्योग यांना मोठी चालना मिळू शकते. नियोजनबद्ध विकासामुळे हजारो युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. महिलांच्या बचत गटांना आणि स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन दिल्यास विकासाचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचेल. आधुनिक तंत्रज्ञानाचाही विकासात प्रभावी वापर आवश्यक आहे. स्मार्ट पार्किंग, डिजिटल माहिती केंद्रे, ऑनलाइन दर्शन सुविधा, सीसीटीव्ही सुरक्षा, गर्दी नियंत्रण प्रणाली, बहुभाषिक मार्गदर्शन आणि आपत्कालीन व्यवस्थापन यामुळे पंढरपूर अधिक सक्षम तीर्थक्षेत्र म्हणून विकसित होऊ शकते. शहराचा विस्तार करताना स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया आणि हरित विकास यालाही तितकेच महत्त्व द्यावे लागेल.


महेश भंडारकवठेकर
भ्र.-७५८८०२०७६६

पंढरपूरचा विकास हा केवळ सरकारी प्रकल्प नसून तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेशी जोडलेला विषय आहे. विठ्ठल भक्तांची श्रद्धा, वारकरी संप्रदायाची परंपरा आणि आधुनिक नागरी सुविधा यांचा समतोल साधण्यातच या विकासाचे खरे यश दडलेले आहे. विठ्ठल कॉरिडॉर हा केवळ रस्ते, इमारती आणि दगडांचा प्रकल्प नसून तो भाविकांच्या अनुभवाला नवी दिशा देणारा, शहराच्या अर्थव्यवस्थेला गती देणारा आणि पंढरपूरला जागतिक धार्मिक पर्यटनाच्या नकाशावर अधिक ठळकपणे स्थान मिळवून देणारा विकासाचा महामार्ग ठरू शकतो.

पंढरीचे वैभव केवळ मंदिरापुरते मर्यादित नाही; ते वारकऱ्यांच्या पावलांत, चंद्रभागेच्या प्रवाहात आणि संतांच्या विचारांत आहे. त्यामुळे विकासाचा प्रत्येक निर्णय हा विठ्ठलाच्या नगरीचा आत्मा जपतच घेतला गेला, तरच भक्ती आणि प्रगती यांचा सुंदर संगम घडेल आणि पंढरपूर खऱ्या अर्थाने जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र बनेल.



### नेमका कॉँरिडोर प्रोजेक्ट आहे तरी काय



## पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांचा ड्रीमप्रोजेक्ट



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजक्ट असलेल्या पंढरपूर कॉँरिडोरला अखेर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय शिखर समितीने दिलेल्या मंजुरीनंतर हा अंतिम निर्णय घेण्यात आला आहे. हा विकास आराखडा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षापासून प्रत्यक्षात अंमलात येणार आहे.

### भव्य प्रोजेक्टची तीन मुख्य विभागात विभागणी

एकुण ३९९३.९० कोटी रुपयांच्या या भव्य आराखड्याची तीन मुख्य विभागांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. यात पंढरपूर कॉँरिडॉँर विकास एकुण ५९७ कोटी रुपये, वारकऱ्यांसाठी समग्र सोयीसुविधांचा विकास २८८.६६ कोटी रुपये, मंदिर परिसर विकास- कॉँरिडोर निर्माण २५४.६१ कोटी रुपये, पुरातन मंदिर व मठांचे जतन व संवर्धन ३६ कोटी रुपये. या बरोबरच पंढरपूर शहर विकास नियोजन एकूण १३८७.९१ कोटी रुपये, शहर सुशोभिकरण- ४८०.५० कोटी रुपये, नदी घाटांचा विकास व सुशोभिकरण- ४४८.३९ कोटी रुपये, नगर प्रदक्षिणा मार्गाचा विकास- १६२.९४ कोटी रुपये, शहरास जोडणारे रस्ते व पूल- १२७. ६० कोटी रुपये, पालखी तळांचा विकास- १००.०० कोटी रुपये, वाहनतळ व व्यापारी संकुल- ६८.४८ कोटी रुपये, पुनर्वसन खर्च व बाधित इमारत मोबदला- एकूण २०२६.७२ कोटी रुपये, भूसंपादन आणि पुनर्वसन खर्च- १७९२.७२ कोटी रुपये, बाधित इमारतींचा- मोबदला- २३४.०० कोटी रुपये अशा बाबींचा समावेश करण्यात आला आहे.


### जिल्हाधिकाऱ्यांवर संनियंत्रण अधिकाऱ्याची जबाबदारी

या संपूर्ण प्रकल्पासाठी सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना 'संनियंत्रण अधिकारी' म्हणून घोषित करण्यात आले आहे. प्रकल्पाच्या संनियंत्रणासाठी पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली 'जिल्हास्तरीय समिती' तर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 'कार्यकारी समिती' गठीत करण्यात आली आहे. कामामध्ये कोणत्याही प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही आणि केवळ मंजूर कामांवरच निधी खर्च होईल, याची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर असेल.

### ऐतिहासिक व पुरातत्त्वीय वारसा जपणार

शासन निर्णयानुसार, पंढरपूरमधील ऐतिहासिक वास्तुंचे काम करताना त्यांची मूळ शैली जपली जाणे अनिवार्य आहे. यासाठी भारतीय पुरातत्त्व विभाग आणि राज्य पुरातत्त्व विभागासारख्या तज्ज्ञ संस्थांकडूनच ही कामे करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच मंदिर किंवा विश्वस्त संस्थेच्या जागेवर काम सुरू करण्यापूर्वी त्यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र आणि पुढील देखभाल - दुरुस्तीबाबतचा करारनामा करणे देखील बंधनकारक राहणार आहे.





### वारकऱ्यांसाठी शासनाचे ऐतिहासिक पाऊल

लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र पंढरपूरच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. बहुचर्चित 'श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखड्या'ला अखेर राज्य शासनाच्या नियोजन विभागाने तब्बल ३९९३.९० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली आहे. या संदर्भातील अधिकृत शासन निर्णय गुरुवार, दि.१८ जून रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

# तुळजापूरच्या बारवा... जलसंस्कृती, श्रद्धा आणि इतिहासाचा अमूल्य ठेवा

## आई तुळजाभवानीच्या सान्निध्यातील प्राचीन जलव्यवस्थापनाचा अद्भुत वारसा

महाराष्ट्राचे कुलदैवत आई श्री तुळजाभवानी देवीचे पवित्र शक्तिपीठ म्हणून तुळजापूरची जगभर ओळख आहे. वर्षभर लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी येथे येतात. मात्र, मंदिराच्या सभोवतालचा एक असा ऐतिहासिक वारसा आहे, जो अनेकांच्या नजरेतून सुटतो. हा वारसा म्हणजे तुळजापूरच्या प्राचीन बारवा-दगडात कोरलेल्या पायऱ्यांच्या विहिरी.

या बारवा केवळ पाण्याचे स्रोत नाहीत, तर त्या हजारो वर्षांच्या जलसंस्कृती, धार्मिक श्रद्धा, स्थापत्यकला, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जीवनाच्या साक्षीदार आहेत. तुळजाभवानी मंदिर जितके पवित्र मानले जाते, तितक्याच श्रद्धेने या बारवांकडेही पाहिले जाते. या जलरचनांमध्ये तत्कालीन समाजाची दूरदृष्टी, अभियांत्रिकी कौशल्य आणि निसर्गाशी सुसंवाद साधणारी जीवनपद्धती दिसून येते.

### देवीच्या चरणी अर्पण होणारे पवित्र जल...

आई तुळजाभवानी ही आदिशक्तीचे स्वरूप मानली जाते. देवीच्या पूजेसाठी वापरले जाणारे जल शुद्ध, पवित्र आणि सात्त्विक असावे, अशी परंपरा प्राचीन काळापासून आहे. मंदिर परिसरातील बारवांचे पाणी यासाठी वापरले जात असे. देवीच्या अभिषेकासाठी, धार्मिक विधींसाठी आणि विविध उत्सवांमध्ये या पवित्र जलाला विशेष महत्त्व होते. भाविक आजही या बारवांच्या जलाला तीर्थस्वरूप मानतात. देवीच्या सान्निध्यात असल्यामुळे या पाण्याला आध्यात्मिक पावित्र्य प्राप्त झाले आहे, अशी श्रद्धा आहे. अनेक भक्त दर्शनापूर्वी या पाण्याचे दर्शन घेतात किंवा त्याचा स्पर्श करून देवीचे स्मरण करतात.

### डोंगरमाथ्यावर उभारलेली जलअभियांत्रिकीची किमया...

तुळजापूर हे डोंगरमाथ्यावर वसलेले प्राचीन नगर. अशा ठिकाणी वर्षभर पाणी उपलब्ध ठेवणे हे मोठे आव्हान होते. त्या काळातील कारागिरांनी भूजलाचा अभ्यास करून दगडी बारवा उभारल्या. पावसाचे पाणी जमिनीत मुरावे, भूजलाची पातळी टिकून राहावी आणि उन्हाळ्यातही पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी अत्यंत वैज्ञानिक पद्धतीने या बारवांची निर्मिती करण्यात आली.

दगडात कोरलेल्या पायऱ्या, मजबूत भिंती, पाण्यापर्यंत सहज पोहोचण्याची व्यवस्था आणि जलसाठा टिकवून ठेवणारी रचना पाहिली की तत्कालीन स्थापत्यशास्त्र किती प्रगत होते, याची जाणीव होते. आज आधुनिक जलसंधारणाच्या संकल्पना ज्या मांडल्या जातात, त्याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे या प्राचीन बारवा आहेत.

### यादवकालीन स्थापत्य परंपरा...

इतिहासकारांच्या मते तुळजाभवानी मंदिराचा विकास यादवकालात झाला. याच कालखंडात मंदिर परिसरात जलसंधारणासाठी अनेक बारवा उभारण्यात आल्या. काळ्या दगडातील भक्कम बांधकाम, सममितीय रचना आणि सुबक कोरीव काम या बारवांच्या स्थापत्यवैभवाची साक्ष देतात. शेकडो वर्षे पाऊस, उन्हाळा आणि नैसर्गिक संकटांचा सामना करूनही या बारवा आजही उभ्या आहेत. हा वारसा त्या काळातील अभियंते, शिल्पकार आणि कारागिरांच्या अद्वितीय कौशल्याची साक्ष देतो.

### तुळजापूरच्या सामाजिक जीवनाचा केंद्रबिंदू..

पूर्वी प्रत्येक गावात विहीर म्हणजे जीवनाचा आधार. तुळजापूरच्या बारवांचेही तेच स्थान होते. पिण्याचे पाणी, स्वयंपाक, प्रवाशांची तहान भागवणे, धार्मिक कार्य, यात्रेकरूंची सोय-अशा अनेक गरजा या बारवांमधून पूर्ण होत असत. महिलांचे संवाद, लोकजीवनातील संस्कार, उत्सव, पारंपरिक प्रथा आणि सामाजिक सलोखा या सर्वांचा केंद्रबिंदू म्हणजे या बारवा होत्या. त्यामुळे त्या केवळ जलस्रोत नव्हत्या, तर लोकसंस्कृतीच्या जिवंत साक्षी होत्या.

### पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश...

आज पाणीटंचाई, भूजलपातळी घटणे आणि हवामान बदल ही गंभीर आव्हाने आहेत. अशा काळात तुळजापूरच्या बारवा आपल्याला जलसंवर्धनाचा महत्त्वाचा संदेश देतात. पावसाचे पाणी साठवणे, जमिनीत मुरवणे, भूजल समृद्ध ठेवणे आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे-ही संकल्पना शेकडो वर्षांपूर्वी या बारवांच्या माध्यमातून प्रत्यक्षात उतरली होती. त्याम ुळे या बारवा म्हणजे आधुनिक जलव्यवस्थापनासाठी प्रेरणास्थान आहेत.

### पर्यटनाच्या नव्या संधी...

तुळजाभवानी मंदिराला येणाऱ्या लाखो भाविकांना जर मंदिरासोबत बारवा, तीर्थस्थळे आणि प्राचीन जलव्यवस्थापनाचा इतिहास सांगणारी वारसा फेरी (क्शीळींरसश थरश्रज्ञ) उपलब्ध झाली, तर तुळजापूरचा पर्यटन अनुभव अधिक समृद्ध होईल. धार्मिक पर्यटनासोबत इतिहास, स्थापत्यकला, पर्यावरण आणि संस्कृती यांचा अभ्यास करण्यासाठी देश-विदेशातील अभ्यासकांनाही हे ठिकाण आकर्षित करू शकते.

### संवर्धनाची काळाची गरज...

अनेक प्राचीन बारवा आज दुर्लक्ष, गाळ, अतिक्रमण आणि अस्वच्छतेच्या विळख्यात अडकल्या आहेत. या वारशाचे संवर्धन करण्यासाठी शासन, पुरातत्त्व विभाग, मंदिर संस्थान आणि स्थानिक नागरिकांनी संयुक्त प्रयत्न करणे आवश्यक आहे. बारवांची नियमित स्वच्छता, गाळ काढणे, संरक्षक दुरुस्ती, प्रकाशयोजना, माहिती फलक, पर्यटन मार्गदर्शक आणि वारसा संवर्धन उपक्रम राबविल्यास तुळजापूरच्या धार्मिक पर्यटनाला नवी ओळख मिळू शकते.

बारवा म्हणजे आपल्या पूर्वजांच्या दूरदृष्टीची अमूल्य देणगी. त्यांनी पाण्याला देवत्व दिले, त्याचे जतन केले आणि पुढील पिढ्यांसाठी समृद्ध जलसंपदा निर्माण केली. आज या वारशाचे संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आई तुळजाभवानीच्या पवित्र नगरीतील या बारवा श्रद्धा, इतिहास, पर्यावरण आणि स्थापत्यकलेचा सुंदर संगम आहेत. त्या प्रत्येकाला सांगतात की, पाणी जपा, संस्कृती जपा आणि वारसा जपा.

आज तुळजापूरच्या या प्राचीन बारवा केवळ दगडी जलरचना नाहीत, तर त्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक स्मृती, जलसंस्कृती आणि धार्मिक परंपरेचे अजरामर प्रतीक आहेत. त्यांचे जतन म्हणजे आपल्या इतिहासाचा, श्रद्धेचा आणि भविष्यातील जलसुरक्षेचा सन्मान होय...











